# दरपत्रक सूचना

कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र. 1, लातूर हे अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर यांच्या कार्यालयासाठी एक एन्होवा कार, वाहन चालकासह ठोक मासिक दराने भाडे तत्वावर घेण्यासाठी पुरवठादार, संस्था अथवा संघटना यांच्या कडून पुढील कालावधी दिनांक 01 नोव्हेंबर 2021 ते 31 मार्च 2022 साठी खालील प्रमाणे मोहरबंद लखोटयात दरपत्रके मागविण्यात येत आहे.

निविदा सुचना जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in / निविदा / रुपये 10 लक्षपर्यंतच्या निविदा सुचना या संकेत स्थळावर पाहावी.

| अ.क्र. | तपशील | | परिमाण | दर |
|---|---|---|---|---|
| 1 | एक एन्होवा कार, वाहन चालक व इंधनासह पुरविणे बाबत. | | 1 नग | |
| | अ) | प्रतिमाह 2000 किमी धाव पर्यंत किमान मासिक भाडे नमुद करावे. | प्रति महिना | |
| | ब) | महिन्यात 2000 किमी पुढे धाव झाल्यास पुढिल किमी साठी प्रती / किमी दर देण्यात यावा. | प्रति किमी | |

**अटी व शर्ती :-**

1. दर पत्रक हे सर्व करासहीत ऑफीस पोंचसहीत आहेत.
2. पुरवठादार वाहन धारकांनी त्यांची मोहरबंद दरपत्रके दिनांक :29.10.2021 रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत पोष्टाने, कुरीअरने अथवा हातोहात दुपारी 14.00 वाजेपर्यंत या कार्यालयात मिळतील अशा बेताने पाठवावीत. मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी 16.00 वाजता इच्छूक पुरवठादारांचे उपस्थितीत उघडण्यात येतील.
3. सदर वाहन हे 3 महिन्याच्या भाडे तत्वावर घेतले जाईल. तसेच आवश्यकते नुसार सदरचा कालावधी वाढविता येवू शकतो . त्या अनुषंगाने मंजूर दरा प्रमाणे वाहन पुरवठा करणे बंधन कारक राहील.
4. प्रचलीत नियमानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) यांच्या कडील सर्व नियम / अटींची पुर्तता पुरवठादाराने करावयाची आहे.
5. वाहन चालक निर्व्यसनी असावा व वाहनचालकांनी स्वच्छ पांढ-या रंगाचे गणवेशात उपस्थित राहणे बंधन कारक राहील.
6. वाहन चालकाची वर्तणूक अथवा वाहनामध्ये बिघाड उद्‌भवल्यास तात्काळ बदली पर्यायी व्यवस्था करुन देणे संबंधीत पुरवठाधारकास बंधनकारक राहील. मुळ अथवा पर्यायी वाहन उपलब्ध न केल्यास प्रतिदिन रक्कम रुपये 3000.00 प्रमाणे आपल्या देयकामधून कपात करण्यात येईल.
7. आवश्यकतेनुसार वाहन चालकास सुट्टीच्या दिवशी देखील काम करावे लागेल.
8. वाहनाची देखभाल व दुरुस्ती पुरवठादाराने करावयाची आहे.
9. देयकाची अदायगी अनुदान उपलब्धते नुसार करण्यात येईल.
10. वाहना संबंधीत व वाहन चालका संबंधीत विमा अथवा ईतर कुठल्याही प्रकारची देय रक्कम या कार्यालयामार्फत दिली जाणार नाही.
11. शासन नियमानुसार लागु असलेले कर कपात करुन उर्वरीत रक्कम प्रदान करण्यात येईल.
12. एक किंवा सर्व दर पत्रके अथवा दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार खालील निम्न स्वाक्षरीतांनी राखून ठेवलेला आहे. याबाबत कोणतेही म्हणणे उत्तर ऐकण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

( रो. सु. जगताप )
कार्यकारी अभियंता,
लातूर पाटबंधारे विभाग क्र. 1 लातूर

जा.क्र. लापाविक्र.1 ला. / भांशा/ 2637 / सन 2021

दिनांक : 20/10/2021

प्रत :- मा. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत :- नोटीस बोर्ड.



Scanned by CamScanner